# सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नाशिक

Email : gadzpnsk@gmail.com Phone : (0253) 2591010

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( साप्रवि), जिल्हा परिषद नाशिक यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम,2005 कलम 19(1) अन्वये दाखल झालेले प्रथम अपिलाचे कामकाज**

प्रथम अपील क्रमांक -2

जा.क्र साप्रवि/मासे/ 371 /2021
नाशिक जिल्हा परिषद, नाशिक
दिनांक 22/12/2021

1.अॅड.सुनिल पांडुरंग दराडे,
102 शिवनेरी हेरिटेज,मल्हार पार्क शेजारी,
सेलिब्रेशन लॉन्स समोर, औरगांबाद रोड,
पंचवटी, नाशिक } अपिलार्थी.

**--विरुध्द--**

1.श्री.रणजीत अरूण पगारे,
जन माहिती अधिकारी तथा
कनि.प्रशा. अधिकारी (साप्र) जि.प.नाशिक } उत्तरवादी...

**माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (1) नुसार प्रथम अपिल**

**-: विवेचन :-**

अॅड.सुनिल पांडुरंग दराडे, 102 शिवनेरी हेरिटेज, मल्हार पार्क शेजारी, सेलिब्रेशन लॉन्स समोर, औरगांबाद रोड, पंचवटी , नाशिक-3 यांनी जन माहिती अधिकारी सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडेस दिनांक 01/10/2021 रोजीच्या माहिती अधिकार अर्जान्वये श्री. मधुकर मुरकुटे (गट विकास अधिकारी, सिन्नर) यांची वैयक्तीक माहिती सोडुन सेवापुस्तिकाच्या संपुर्ण पानाची सही शिक्यांची नक्कल इ.माहितीची मागणी केली होती.

सदर माहिती अधिकार अर्ज ग्रामपंचायत विभागाकडुन या संकलनास दिनांक 01/10/2021 रोजी प्राप्त झाला होता. सदर अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी श्री. पगारे, यांनी अर्जदार यांचे मुळ अर्जात नमुद विषयाची माहिती हो साप्रवि आस्था-1 संकलनाशी निगडीत असल्याने व अर्जात मागणी केलेली माहिती मुदतीत उपलब्ध करून देणे करिता माहिती अधिकार मुळ अर्ज या कार्यालयाकडील दिनांक 13/10/2021 चे पत्रान्वये आस्था 1 संकलनाकडे वर्ग केला होता. सदर मुळ अर्जानुसार जन माहिती अधिकारी तथा कनि. प्रशा. अधिकारी (साप्र) अपिलार्थी यांना मागणी केलेली माहिती ही वैयक्तीक स्वरूपाची असल्याने सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक दिनांक 17/10/2014 व माहिती अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 पोटकलम (त्र) मधील तरतुदी नुसार आपणास माहिती पुरविता येत नाही असे या कार्यालयाकडील जा.क्र.जिपना/साप्रवि/आस्था-1/445/2021 दिनांक 28/10/2021 चे पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

अपिलार्थी यांना दिनांक 01/10/2021 रोजीच्या अर्जातील माहिती उपलब्ध करुन न दिल्याने अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 19 (1) नुसार दि.12/11/2021 रोजी प्रथम अपिल अर्ज या कार्यालयाकडे ग्रामपंचायत विभागाकडुन दिनांक 29/11/2021 व या संकलनास दिनांक 01/12/2021 रोजी या संकलनास प्राप्त झाला आहे.

अपिल अर्जाच्या अनुषंगाने जा.क्र.साप्रवि/मासे/360/2021 दिनांक.02/12/2021 अन्वये दिनांक 10/12/2021 रोजी दु. 3.00 सुनावनी ठेवण्यात आली होती. मात्र अपिलार्थी यांचेकडील दिनांक 08/12/2021 चे दुरध्वनी संदेशान्वये सदर अपिल सुनावणी दिनांक 13/12/2021 रोजी दुपारी- 3.00 वाजता प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकरी (साप्रवि), जि.प.नाशिक यांचे दालनात घेण्यात आली. सुनावणीस अर्जदार तथा अपिलार्थी अॅड.सुनिल दराडे, श्री.

Scanned by CamScanner

रणजीत पगारे, जन माहिती अधिकारी तथा कनि. प्रशा.अधिकारी (साप्र) जि.प.नाशिक, आस्था-01 संकलनाच्या श्रीम.सोनार, क.सहा. इ. उपस्थित होते, प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी(साप्र) जि.प.नाशिक यांनी अपिलार्थी यांना अपिलाचे प्रयोजन विचारले असता जन माहिती अधिकारी यांनी मला माहिती उपलब्ध करून दिलेली नाही असे अपिलार्थी अॅड.दराडे, म्हणाले, नंतर प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्यकार्यकारी अधिकारी(साप्र) जि.प.नाशिक यांनी जन माहिती अधिकारी तथा कनि. प्रशा. अधिकारी (साप्र) यांना विचारणा केली असता अपिलार्थी यांना मागणी केलेली माहिती ही वैयक्तीक स्वरूपाची असल्याने सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक दिनांक 17/10/2014 व माहिती अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 पोटकलम (त्र) मधील तरतुदी नुसार आपणास माहिती पुरविता येत नाही असे या कार्यालयाकडील जा.क्र.जिपना/साप्रवि/आस्था-1/445/2021 दिनांक 28/10/2021 चे पत्रान्वये अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी (साप्र) व अपिलार्थी अॅड.सुनिल दराडे, यांनी केलेल्या युक्तीवादावरून मी प्रथम अपिलीय अधिकारी खालील प्रमाणे निर्णय देत आहे.

**-: निर्णय :-**

अॅड.सुनिल पांडुरंग दराडे, अपिलार्थी यांच्या दिनांक 01/10/2021 रोजीच्या मुळ अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. तसेच या कार्यालयाकडील जा.क्र.जिपना/साप्रवि/आस्था-1/445/2021 दिनांक 28/10/2021 चे पत्र अपिलार्थी यांना पुन:श्च देण्यात यावे.

सदरचे अपिल निकाली काढणेत येत आहे.

(आनंदराव पिंगळे)
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)**
**जिल्हा परिषद,नाशिक**

**स्थळ - नाशिक**
**दि. 13 डिसेंबर 2021**
22/12/2021

**रजिष्टर पोस्टाने**

प्रति,

1 अॅड.सुनिल पांडुरंग दराडे, 102 शिवनेरी हेरिटेज, मल्हार पार्क शेजारी, सेलिब्रेशन लॉन्स समोर, औरंगाबाद रोड, पंचवटी नाशिक-3
2. श्री. रणजीत पगारे, जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी (साप्रवि) जि.प.नाशिक
3. श्रीम. सरला सोनार, कनि.सहा. आस्था- 1 साप्रवि, जि.प.नाशिक
4. आय टी सेल कक्ष, साप्रवि, जि.प.नाशिक यांना कार्यवाहीस्तव रवाना.

---

माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) नुसार व्दीतीय अपील करावयाचे असल्यास सदर आदेशाच्या दिनांकापासुन 90 दिवसांचे आत खालील पत्त्यावर अपिलीय अधिकारी यांचे कडेस अपील करता येईल.

मा.राज्य माहिती आयुक्त,राज्य माहिती आयोग,नाशिक खंडपिठ,
पिनॅकल मॉल,चौथा मजला,त्र्यंबकनाका सिग्नल जवळ,नाशिक
तालुका व जिल्हा नाशिक (महाराष्ट्र),दुरध्वनी क्रमांक (0253) 2232764

Scanned by CamScanner